0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) दक्षता शाखेकडून दि.२०/०७/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा.५७८ दिनांक २२/०७/२०११, ११/०८/२०११ व २३/०८/२०११.

३) या कार्यालयाचे अंतरीम आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा.५७९, दिनांक २२/०७/२०११.

४) शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेचे दिनांक २७/०७/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले निवेदन.

५) शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशा शिवाजीराव साळवे यांनी ॲड. अमरनाथ डोलारे यांचे वकालतनाम्यासह टपालामार्फत सादर केलेले दिनांक ०५/०८/२०११ रोजीचे निवेदन.

६) या कार्यालयाची "नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा.६५० दि.११/८/२०११.

७) प्रल्हाद भाई एच. पटेल यांचे दिनांक १६/०८/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

८) उप नियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांचा दि.१६/०८/२०११ रोजीचा अहवाल.

९) टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-७४३९ चें मालक नारायण कुंज राजन यांचे वतीने ॲड प्रकाश जैन यांनी वकालतनाम्यासह टपालामार्फत सादर केलेले दि.२४/८/२०११ रोजीचे निवेदन.

१०) शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेचे दिनांक २६/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले निवेदन.

११) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विक्रोळी पोलीस स्टेशन यांचे दि. २८/८/२०११ रोजीचे अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा. ७५१
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज:टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : १७ /०९/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी /कर्मचारी पंचासह साई प्रकाश बॅन्कवेट हॉलच्या समोर, टागोर नगर, ग्रुप नं. ३, कनमुटकर मार्ग, विक्रोळी (पूर्व) येथे दुपारी १२:०० वाजता सुमारे १०० फुटावर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-

०४-ईवाय-७४३९ जवळ पोहोचले. सदर टेंम्पोमध्ये बसलेल्या व्यक्तीस त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख असे सांगून सदर टेंम्पोचा चालक असल्याचे सांगितले. सदर इसमास त्याच्या टेंम्पोमध्ये काय आहे, कोठून आणले व कोणाच्या सांगण्यावरुन आणले, याची चौकशी केली असता, सदर टेंम्पोमध्ये अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३० ई/ १३५ मधून १५० बाचके, वजन ७५०० किलो गहू वाशी येथे घेऊन जाण्यासाठी आणलेला असून सदर काम टेंम्पोचे मालक मनुराज राजन नारायण यांच्या सांगण्यावरुन केल्याची त्याने माहिती दिली.

त्यानंतर चालक शेख यास मनुराज यांना दुरध्वनीवरुन बोलविण्यास सांगितले असता, त्याने मनुराज यांना बोलाविले. मनुराज उपस्थित झाल्यानंतर त्याला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मनुराज राजन नारायण असे सांगून ते माल वाहतुकदार असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी वसंत जयस्वाल (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्या सांगण्यावरुन चालक शेख याचेमार्फत टेंम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ याच्यासह अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३० ई/ १३५ जमिल नगर, भांडूप येथे पाठवून शिधावाटप यंत्रणेवर उपलब्ध असलेला अनुदानित दराचा गहू वाशी येथे खुल्या बाजारात विकण्याच्या उद्देशाने वाहतूक दर निश्चित करुन वर नमूद टेंम्पोमध्ये भरलेला असल्याची माहिती दिली. शेख व मनुराज यांना शिधावाटप यंत्रणेवरील गव्हाची वाहतूक करणेबाबत कोणताही प्राधिकरणाने दिलेला परवाना, कागदपत्रे इत्यादी सादर करण्यास सांगितले असता अशाप्रकारची कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडे नसल्याची माहिती त्यांनी दिली. टेंम्पो चालक मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख व माल वाहतुकदार मनुराज राजन नारायण यांचे जबाब नोंदविण्यात आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू गैरमार्गाने खरेदी विक्री करुन त्याची अनधिकृतपणे व बेकायदेशीररित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी अवैधमार्गाने खुल्या बाजारात काळ्या बाजाराने वितरीत करण्यासाठी वाहतूक होत असल्याचे सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम ३, ३ अे, ४, ५, ६ (३) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ३, ४ तसेच (४) भा.दं.वि. चे कलम ४२०, ४०६ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द विक्रोळी पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २२६/२०११ दि.१५/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

CONTROLLER OF RATIONING & DIR... HEAD OFFICE

0003

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | आयशर कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टेम्पोमधील १५० बाचके गहू | ७५०० किलो | १,५०,०००/- |
| | | एकूण | १३,५०,०००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उप नियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र.१ अन्वये केलेली आहे. सबब, विक्रोळी पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. २२६/२०११ दि.१५/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्येमाल शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ०३/०८/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक १७/०८/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तथापी, दिनांक १७/०८/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करुन सदर सुनावणी दिनांक १६/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दरम्यान शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशा शिवाजीराव साळवे यांनी ॲड. अमरनाथ डोलारे यांचे वकालतनाम्यासह त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये टपालामार्फत निवेदन सादर केले.

तसेच शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्था यांनी वाचावे क्र.४ अन्वये टपालामार्फत या कार्यालयात सादर केलेल्या निवेदनात, सदर जप्त केलेला गहू हा सकस आहार पुरवठा योजने अंतर्गत वाटप करावयाचा असल्याचे नमुद करुन, त्यासोबत, भारतीय खाद्य निगम, बोरीवली या गोडावूनमधील दिनांक २५/०६/२०११ रोजी तसेच मे. पटेल ट्रेडर्स, नालासोपारा यांचेकडून दिनांक ०८/०६/२०११ रोजी गहू खरेदी केल्याची पावती (बिल) सादर केली आहे. सदर पावती पहाता, मे पटेल ट्रेडर्स या खाजगी व्यापाऱ्याने शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) यांना दिनांक ०८/०६/२०११ रोजी ९५०० किलो ग्रॅम गहू विक्री केल्याचे दिसून येते. सबब, सदर प्रकरणी त्यांचेही म्हणणे ऐकूण घेणे आवश्यक असल्याने वाचावे क्र.६ अन्वये नोटीस बजावून मे.पटेल ट्रेडर्स यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून दिनांक १६/०८/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस मे.पटेल ट्रेडर्सचे मालक श्री प्रल्हादभाई एच. पटेल उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीचेवेळी ई परिमंडळ वडाळा कार्यालयाचे उपनियंत्रक शिधावाटप उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ८ अन्वये त्यांचा अहवाल सादर केला. तथापी, सदर सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २६/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस ॲड. प्रकाश जैन हे त्यांचे अशील टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-७४३९ चे मालक नारायण कुंज राजन यांचे वतीने उपस्थित राहीले. दरम्यान त्यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र.९ अन्वये टपालामार्फत सादर केले. तसेच सदर सुनावणीस ॲड. अे. डब्ल्यू. डोलारे हे त्यांचे अशील शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) व संस्थेचे अधिकृत शिधावाटप दुकान क्र ३० ई १३५ चे वतीने संस्थेचे अध्यक्ष श्रीमती आशा शिवाजीराव साळवे, सचिव श्रीमती स्मिता चंद्रकांत शिंदे यांचेसह उपस्थित राहीले व त्यांचे निवेदन वाचावे क्र.१० अन्वये सादर केले.

सदर सुनावणीस वंसत जयस्वाल तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. तथापी, दरम्यान तपासी पोलीस अधिकारी यांनी त्यांचे अभिवेदन वाचावे क्र.११ अन्वये टपालामार्फत या कार्यालयात सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे.पटेल ट्रेडर्सचे मालक श्री प्रल्हाद भाई एच. पटेल यांनी युक्तिवाद केला की, त्यांचे पटेल ट्रेडर्स या नावे नालासोपारा येथे भाडे तत्वावर दुकान होते. परंतु गेल्या २ वर्षापूर्वी सदरचे दुकान बंद केले आहे व तेथे गॅरेज सुरु आहे. तसेच शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी ही संस्था त्याचे दुकानाचे नावावर अनधिकृतपणे उपयोग करीत आहे. त्याचा या बिलाशी काहीही संबंध नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस, शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) व संस्थेचेच अधिकृत शिधावाटप दुकान क्र ३० ई १३५ चे वतीने संस्थेचे अध्यक्ष श्रीमती आशा शिवाजीराव साळवे, सचिव श्रीमती स्मिता चंद्रकांत शिंदे यांचेसह उपस्थित ॲड. अे. डब्ल्यू. डोलारे यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांचा वकालतनामा यापुर्वीच दिनांक ०५/०८/२०११ च्या निवेदनासोबत सादर केला आहे. शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेची उपनिबंधक सहकारी संस्था यांचेमार्फत सन १९९६ साली नोंदणी झाली आहे. तसेच सदर संस्थेच्या नावाने दिनांक ०२/०१/२००१ रोजी ३० ई/ १३५ हे अधिकृत

शिधावाटप दुकान मंजूर झाले. तेंव्हापासून सदर दुकानाबाबत कोणतीही तक्रार नाही. बृहन्मुंबई महानगर पालीकेतील इयत्ता १ ली ते ५ वी व ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दैनंदिन शालेय पोषण आहार पुरवठा करण्याबाबत सदर संस्थेला सन २००४ पासून सन २०१२ पर्यंत प्रत्येक २/३ वर्षाप्रमाणे निविदा मंजूर करण्यात आली होती. तसेच महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत झोपडपट्टीतील अंगनवाड्यामधील वय वर्ष १.ते ६ वयोगटातील बालकांना / लाभार्थींना दैनंदिन सकस आहार पुरवठा करण्याचीही निविदा सन २००६ साली सदर संस्थेस मंजूर करण्यात आली. तेंव्हापासून सदरची संस्था दैनंदिन १३ व सात अंगणवाड्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करत आहे. सदर योजनेअंतर्गत तांदुळ व गहू गोडावून व्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, बोरीवली व रे रोड येथून घेण्याचे आदेश संबंधीतांनी दिले आहेत. त्यानुसार मंजूर झालेल्या निवीदाप्रमाणे तांदुळ व गहू आणले जात आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय चेंबूर येथे असून, त्या कार्यालयाची दुरुस्ती त्याचप्रमाणे महानगर पालीका रस्त्याचे काम चालू असल्याने संस्थेने चार महिन्यापासून भांडूप येथील संस्थेच्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३० ई/ १३५ मध्ये संपुर्ण तांदुळ व गहू ठेवला होता. तांदुळ पुर्ण संपविला. परंतु शिल्लक असलेला एकूण ७५०० किलो गहू (१५० पोती) चेंबूर येथे टेम्पोने नेत असतांना टागोरनगर विक्रोळी येथे रेशनिंग विभागाने पकडला. त्यावेळी संस्थेच्या सदर रेशन दुकानातील नोकर वसंत जयस्वाल सोबत नसतांनाही त्याला बोलावून घेतले व गव्हाची कोणतीही चौकशी न करता वसंत जयस्वाल याला दुकानाचा मालक दाखवून वेगवेगळे आरोप करुन गुन्हा दाखल केला. तसेच टेम्पो चालकाने भिती पोटी चुकीची माहिती दिली. फिरत्या पथकातील अधिकाऱ्यांनी कोणतीही चौकशी न करता हेतूपुरस्सर व स्वार्थापोटी गहू जप्त केला असून, सदरचा गहू संस्थेच्या ३० ई/१३५ या दुकानाच्या नावावर दाखविण्यात आला आहे. तरी सदर संस्थेने ३० ई/१३५ या दुकानात ठेवलेला व दुकानातून चेंबूर येथील कार्यालयात नेत असतांना पकडलेला पुरक पोषण आहार योजनेतील गहू संस्थेच्या ताब्यात देण्यात यावा असे सांगून तसे लेखी निवेदन व कागदपत्र सादर केले.

अॅड. प्रकाश जैन हे त्यांचे अशील टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-७४३९ चे मालक नारायण कुंज राजन यांचे वतीने युक्तिवाद केला की, जप्त केलेला टेम्पो हा नारायण कुंज राजन यांचे नावे नोंदणी असून, सदर टेम्पो कोलमंडल बँक येथून कर्जाने खरेदी केला आहे. धान्याचे वितरण करण्याकरीता टेम्पो भाड्याने पाहीजे म्हणून वसंतराव रामलाल जयस्वाल हे टेम्पो मालक नारायण कुंज राजन याचेकडे आले. त्यानुसार टेम्पोमध्ये धान्य घेवून जात असतांना टेम्पो पकडला व जप्त केला. त्यांचा टेम्पो अद्याप विक्रोळी पोलीस स्टेशनमध्ये असून, व्यवसायावर व कर्जाचे हप्ते फेडण्यावर परिणाम झाला आहे. तरी त्यांचा जप्त केलेला टेम्पो योग्य त्या अटीवर त्याला परत करावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विक्रोळी पोलीस स्टेशन यांनी दिनांक २८/०२/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवदनात, जप्त टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-७४३९ परत मिळणेबाबत टेम्पो मालक नारायण कुंज राजन यांनी मा.न्यायालयात अर्ज केला होता. मा.न्यायालयाने सदरचा टेम्पो या कार्यालयाचे आदेशानुसार ताब्यात घेणेबाबत टेम्पो मालकास आदेश दिले. सदरचा टेम्पो हा नारायण कुंज राजन यांच्या मालकीचा असून, हा टेम्पो योग्य त्या अटी व शर्तीवर त्यांना देण्यास पोलीसांची हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

सदर प्रकरणी घेण्यात आलेल्या सुनावणीस वसंत जयस्वाल व टेम्पो चालक मोहम्मद हुसेन जियाऊद्दीन शेख उपस्थित राहीले नाहीत.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या बातमीनुसार भरारी पथकातील अधिकारी हे पंचासह साई प्रकाश बॅन्कवेट हॉलच्या समोर, टागोर नगर, ग्रुप नं. ३, कनमुटकर मार्ग, विक्रोळी (पूर्व) येथे सुमारे १०० फुटावर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ जवळ पोहोचले असता, सदर टेंम्पोमध्ये बसलेले मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख या इसमास त्याच्या टेंम्पोमध्ये काय आहे, कोठून आणले व कोणाच्या सांगण्यावरुन आणले, याची चौकशी केली असता, तो सदर टेंम्पोचा चालक असल्याचे सांगून, टेंम्पोमध्ये अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३० ई/ १३५ मधून १५० बाचके, वजन ७५०० किलो गहू वाशी येथे घेऊन जाण्यासाठी आणलेला असून सदर काम टेंम्पोचे मालक मनुराज राजन नारायण यांच्या सांगण्यावरुन केल्याची त्याने माहिती दिली. त्यानंतर टेम्पो चालक शेख याने मनुराज राजन यांना दुरध्वनीवरुन बोलविल्यानुसार मनुराज राजन उपस्थित झाले. त्यांचेकडे याबाबत विचारणा केली असता, ते माल वाहतुकदार असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी वसंत जयस्वाल याच्या सांगण्यावरुन टेंम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ हा चालक शेख याच्यासह अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३० ई/१३५ भांडूप येथे पाठवून शिधावाटप यंत्रणेवर उपलब्ध असलेला अनुदानित दराचा गहू वाशी येथे खुल्या बाजारात विकण्याच्या उद्देशाने वाहतूक दर निश्चित करुन वर नमूद टेंम्पोमध्ये भरलेला असल्याची माहिती दिली. शेख व मनुराज यांना शिधावाटप यंत्रणेवरील गव्हाची वाहतूक करणेबाबत कोणत्याही प्राधिकरणाने दिलेला परवाना, कागदपत्रे इत्यादी सादर करण्यास सांगितले असता. अशाप्रकारची कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडे नसल्याची माहिती त्यांनी दिली. यावरुन सदर टेम्पो व त्यामधील एकूण १५० बाचक, वजन ७५०० किलो गहू जप्त करण्यात आला.

शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) व संस्थेचेच अधिकृत शिधावाटप दुकान क्र ३० ई १३५ या संस्थेने केलेल्या खुलाशात, सदरची संस्था महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत झोपडपट्टीतील अंगनवाड्यामधील वय वर्ष १ ते ६ वयोगटातील बालकांना / लाभार्थींना पुरक पोषण आहार योजने अंतर्गत दैनंदिन सकस आहार पुरवठा करतात. सदर योजनेअंतर्गत तांदुळ व गहू गोडावून व्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, बोरीवली व रे रोड येथून घेण्याचे आदेश संबंधीतांनी दिले असून, त्यानुसार मंजूर झालेल्या निवीदाप्रमाणे तांदुळ व गव्हाची उचल केली जाते. चेंबूर येथील संस्थेच्या मुख्य कार्यालयाची दुरुस्ती त्याचप्रमाणे महानगर पालीका रस्त्याचे काम चालू असल्याने संस्थेने चार महिन्यापासून भांडूप येथील संस्थेच्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३० ई/ १३५ मध्ये संपुर्ण तांदुळ व गहू ठेवला होता. संपुर्ण तांदुळ संपविला होता. परंतु शिल्लक असलेल्या १५० पोती गहू, वजन ७५०० किलो गहू टेम्पोने चेंबूर येथे नेत असतांना टागोरनगर विक्रोळी येथे रेशनिंग विभागाने पकडला असल्याचे नमुद करुन सदर संस्थेन भारतीय खाद्य निगम, बोरीवली येथील गोदामातून दिनांक २५/०६/२०११ रोजी २७७ किलो गहू व मे. पटेल ट्रेडर्स, नालासोपारा या व्यापाऱ्याकडून दिनांक ०८/०६/२०११ रोजी ९५०० किलो गहू खरेदी केल्याची पावती सादर केली आहे. तथापी, मे.पटेल टेडर्सचे मालकाने सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, त्यांचे पटेल टेडर्स या नावाने असलेले दुकान गेल्या दोन वर्षापासून बंद केले असून, शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेला गहू दिला नसल्याचे नमुद केले आहे. म्हणजेच संस्थेने मे.पटेल ट्रेडर्स यांचेकडून गहू उचल केल्याबाबत खोटी पावती सादर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. संस्थेच्या चेंबूर येथील कार्यालयाच्या दुरुस्तीचे काम चालू असल्याने सकस पोषण आहार योजनेतील तांदुळ व गहू संस्थेच्याच भांडूप येथील रेशन दुकानात गेल्या चार महिन्यापासून ठेवत असल्याचा संस्थेने खुलासा केला आहे. जरी सदर संस्थेचे अधिकृत शिधावाटप दुकान असले तरी शासनाच्या योजनेतील तांदुळ व गहू रेशन दुकानामध्ये ठेवण्याबाबत संबंधीत प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक असतांना, अशी कोणतीही परवानगी संस्थेने घेतलेली नाही. तसेच अपरीहार्य परिस्थितीत अचानकपणे स्थलांतर करावे लागल्यास तात्काळ संबंधित यंत्रणेला कळविणे आवश्यक आहे. तथापी, या प्रकरणात संस्थेने कोणत्याही संबंधित शासकीय यंत्रणेला याबाबत कळविले नाही. त्यामुळे संस्थेच्या या हेतूविषयी साशंकता दिसून येते.

शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत माहे जानेवारी २०११ ते मार्च २०११ साठी तांदुळ व गहू मंजूरीबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी दिलेले आदेश पहाता, सदर शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेस २.७७ क्विंटल गहू मंजूर असल्याचे दिसून येते. तथापी, धाडीच्या वेळी १५० पोती गहू, वजन ७५०० किलो गहू जप्त करण्यात आला असून, तो संस्थेस मंजूर केलेल्या नियतनापेक्षा जास्त प्रमाणात आहे. तसेच ७५०० किलो गव्हाबाबत कोणतेही वैध कागदपत्रे संस्थेने सादर केलेली नाहीत. जरी संस्थेने

मे. पटेल ट्रेडर्स यांचेकडून ९५०० किलो गहू उचल केल्याची पावती सादर केली असली तरी, मे. पटेल ट्रेडर्सचे मालकाने शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) या संस्थेला गहू दिला असल्याचे सुनावणीचेवेळी अमान्य केले आहे. तसेच सदरची संस्था सकस आहार पुरवठा योजनेत अंतर्गत अंगनवाड्यांना गव्हाचा पुरवठा करीत असून, तो गहू भारतीय अन्न महामंडळ, बोरीवली व रे रोड येथून घेण्याचे आदेश संबंधीतांनी दिले असल्याचे खुलाशात नमुद करुन भारतीय खाद्य निगम येथील गोदामातून दिनांक २५/०६/२०११ रोजी २७७ किलो गहू उचल केल्याची पावती सादर केली आहे. तथापी, घटनास्थळी टेम्पोमध्ये आढळून आलेल्या गव्हाच्या १५० गोण्या या भारतीय खाद्य निगमच्या नसल्याचे दिसून आले आहे. पोषण आहार योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना पुरविण्यासाठी भारतीय खाद्य निगमकडून गव्हाचा पुरवठा होत असतांना खुल्या बाजारातील गहू अंगणवाडयासाठी विकत घेण्याची कोणतीही तरतूद नाही. अथवा खुल्या बाजारातून गहू विकत घेण्यासाठी अशी कोणतीही परवानगी संबंधित विभागाने दिलेली नाही. घटनेच्यावेळी जप्त टेम्पो क्र.एमएच-०४-ईवाय-७४३९ चे चालक मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख यांनी, सदरचा जप्त १५० गोणी गहू वजन ७५०० किलो हा टेम्पो मालक मनुराज राजन नारायण यांच्या सांगण्यावरुन भांडूप येथील ३० ई/१३५ या रेशन दुकानातून टेम्पोमध्ये भरुन वाशी येथे पोहचविण्यासाठी जात असल्याचा जबाब घटनेच्या वेळी दिला आहे. त्याचप्रमाणे मनुराज राजन नारायण यांनीही, दिनांक १५/०७/२०११ रोजी वसंत जयस्वाल यांनी दुरध्वनीवरुन सांगीतल्यानुसार टेम्पो वाहतुकीचे भाडे ठरवून चालक मोहम्मद शेख यांना सदर टेम्पो भांडूप येथील ३० ई/१३५ या रेशन दुकानात पाठवून तेथून शिधावाटप यंत्रणेवर उपलब्ध असलेला १५० गोणी गहू टेम्पोमध्ये भरुन वाशी येथे जाण्याची सुचना चालकास दिली असल्याचा जबाब घटनेच्यावेळी दिला आहे.

प्रस्तूत प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्याची सत्यासत्यता मा. न्यायालयात तपासली जाईलच. मात्र सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन आरोपी यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू गैरमार्गाने खरेदी विक्री करुन त्याची अनधिकृतपणे व वेकायदेशिररित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी खुल्या बाजारात वितरीत करण्यासाठी वाहतूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा.५७९, दि २२/०७/२०११ चे अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ हा नारायण कुंजू राजन यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्र क्र. १०जी ०३३९९२ वरुन दिसून येते. तसेच

नारायण कुंजू राजन यांनी केलेल्या खुलाशात, धान्याचे वितरण करण्याकरीता टेम्पो भाड्याने पाहीजे म्हणून वसंतराव रामलाल जयस्वाल हे त्याचेकडे आले. त्यांचे टेम्पोमध्ये धान्य घेवून जात असतांना टेम्पो पकडला व जप्त केला. त्याचा टेम्पो अद्याप विक्रोळी पोलीस स्टेशनमध्ये असून, त्यांच्या व्यवसायावर व कर्जाचे हप्ते फेडण्यावर परिणाम झाला असल्याचे नमुद करुन जप्त केलेला टेम्पो योग्य त्या अटीवर परत करावा, अशी विनंती केली आहे. टेम्पो मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, टेम्पो मालकाचे अपरोक्ष जरी त्यांचे वाहनाचा गैरवापर झाला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ) (क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ हा तीच्या किंमतीएवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो मालकास परत करण्याच्या अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरते सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये विक्रोळी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. २२६/२०११ दि.१५/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक २२/०७/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टेम्पोच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टेम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा टेम्पो मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टेम्पो लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ चे चालक, मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख
२) टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ चे मालक, मनुराज राजन नारायण
३) वसंत जयस्वाल
४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३० ई/ १३५ चे मालक
५) शिवप्रेरणा महिला औद्योगिक उत्पादक सहकारी सोसायटी (मर्या.) चे अध्यक्ष/सचिव
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विक्रोळी पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, विक्रोळी पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.